# पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक – पिन 422003

दुरध्वनी नंबर 0253-2309700

E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट** दिनांक : २१/१०/२०२४

## विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर नाशिक ग्रामीण पोलीसांची अवैध व्यवसायांविरोधात व्यापक स्वरूपात कारवाई - मालेगावात ग्रामीण पोलीसांचा रूट मार्च

---

दिनांक १५/१०/२०२४ रोजी पासुन महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागु करण्यात आली असून त्या पार्श्वभुमीवर नाशिक परिक्षेत्राचे मा.विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. दत्तात्रय कराळे, नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती यांचे मार्गदर्शनाखाली दि. १५/१०/२०२४ रोजी पासून नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे अवैध व्यवसायांविरोधात व्यापक स्वरूपात कारवाई करण्यात येत आहे.

सदर कारवाईत दिनांक २० ऑक्टोबर २०२४ रोजी नाशिक ग्रामीण व मालेगाव विभागातील पोलीस ठाणे हद्दीत देशी विदेशी मद्याची विक्री व वाहतुक तसेच हातभट्टीची गावठी दारू तयार करणारे एकुण ४२ इसमांविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये कारवाई करून ४१ गुन्हे दाखल करण्यात आले आहे. त्यात देशी विदेशी मद्य व हातभट्टीची गावठी दारू तयार करण्यासाठी लागणारे रसायन व साहित्य सामुग्री असा एकुण ४,६७,६२०/- रूपये किंमतीचा मुद्देमाल नाश / जप्त करण्यात आला आहे.

मालेगाव व मनमाड परिसरात अवैधरित्या गुटख्याची विक्री करणारे इसमांविरूध्द ०२ गुन्हे दाखल करण्यात आले असुन १,३५,०२६/- रू. किं.चा अवैध गुटखा जप्त करण्यात आला आहे. तसेच सिन्नर एम.आय. डी.सी. मध्ये हॉटेल गुलमोहर परिसरात विनापरवाना बेकायदेशीररित्या चालणारे जुगार अड्डयावर छापा टाकुन जुगार खेळणारे व खेळविणारे इसमांविरूध्द महाराष्ट्र जुगार कायदा कलम ४, ५ प्रमाणे कारवाई करून गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यात ६४,७६०/- रूपये रोख व जुगाराचे साहित्य साधने जप्त करण्यात आली आहे.

तसेच मालेगाव शहर व सिन्नर परिसरात काहीतरी दखलपात्र स्वरूपाचा गुन्हा करण्याचे उद्देशाने सार्वजनिक ठिकाणी धारदार तलवार कब्जात बाळगुन लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे दोन इसमांना ताब्यात घेवुन त्यांचेविरूध्द मालेगाव शहर व सिन्नर पोलीस ठाणेस भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

तसेच निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी याकरीता जिल्हा अभिलेखावरील सराईत गुन्हेगार, हिस्ट्रीशीटर तसेच उपद्रवी इसम व समाजकंटक असे एकुण ८४७ इसमांवर आज रोजीपर्यंत विविध कलमान्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

तसेच विधानसभा निवडणुक सन २०२४ च्या अनुषंगाने नाशिक जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी, समाजकंटकांवर व गुन्हेगारांवर वचक राहुन निवडणुका भयमुक्त वातावरणात पार पडाव्यात याकरीता जिल्हा पोलीस दलातर्फे मालेगाव शहरातील छावणी पोलीस ठाणे हद्दीत रूट मार्च काढण्यात आला होता. सदर रूटमार्च मध्ये मालेगाव कॅम्प उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. सुरज गुंजाळ, आय.टी.बी.पी. पोलीस पथकाचे कमांडंट, छावणी पो.स्टे.चे पोलीस निरीक्षक श्री. दिपक जाधव व दुय्यम अधिकारी, आय.टी.बी.पी. पोलीस पथकाची एक कंपनी असा पोलीस फोर्स सहभागी झाला होता. सदर रूट मार्च छावणी पोलीस ठाणे येथुन सुरु होवून मोसम पुल, सावता चौक, रामसेतु पुल, मौलाना इसाक चौक, भवानी चौक, सावता नगर, मोतीबाग नाका, निसर्ग हॉटेल, मोसम पुल व परत छावणी पो.स्टे. आवारात शिस्तबध्द पध्दतीने संपन्न झाला.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे तसेच अवैध व्यवसायांचे समुळ उच्चाटन करण्यासाठी पोलीस ठाणे निहाय वरील प्रमाणे सत्वर कारवाई करण्यात येणार आहे.